## निशाणी क्र.३२८ खालील आदेश

(दिनांक १६/०८/२०२४)

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १३ब ते १३फ यांनी नि. १६५/1 सोबत हजर केलेल्या मोडी लिपीतील गहाणखतास निशाणी देण्याकरीता दाखल केला आहे.

**प्रतिवादीचे थोडक्यात कथन खालील प्रमाणेः-**

२. दिनांक ३१/१/२०२४ रोजी प्रस्तुत दाव्यात नि. ३१६-अ खाली आदेश पारीत करुन वादीला सदर आदेशापासून १५ दिवसाच्या आत निशाणी १६५/1 लगत दाखल असलेले दिनांक २१/३/१९४२ चे मोडी लिपीतील गहाणखताची मराठी भाषेतील लिप्यांतरीत प्रत सादर करण्याचे निर्देश दिले होते. परंतु प्रतिवादी यांनी सदर निर्देशाप्रमाणे गहाण खताची लिप्यांतरीत प्रत अभिलेखावर आजतागायत दाखल केली नाही. त्यामुळे प्रतिवादीने हजर केलेली गहाणखताची लिप्यांतर प्रत वादीला मान्य आहे असा निष्कर्ष निघतो. प्रतिवादीने नि.१६५/1 कडे मुळ गहाणखताच्या भाषांतराची प्रत दाखल केली आहे ती मुळ गहाणखताप्रमाणे आहे. प्रतिवादीने दाखल केलेला गहाणखताचा दस्तऐवजावर तत्कालीन सबरजिस्ट्रार, सावंतवाडी आणि बांदे यांचा दिनांक २१/३/१९४२ रोजीचा शिक्का व पट्टा मराठीत नमुद केला आहे. त्यावरुन सदर गहाणखत दिनांक २१/३/१९४२ रोजी सबरजिस्ट्रार, सावंतवाडी यांच्याकडे नोंदविले गेले असे सिध्द होते. त्यामुळे भारतीय पुरावा कायदा कलम ९० अन्वये सदर दस्त ३० वर्षापूर्वीचा असल्यामुळे त्यास निशाणी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३.        वादीने प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे नि. ३२९ वर दाखल करुन अर्जास विरोध केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादीने दाखल केलेला अर्ज खोटा व बेकायदेशीर आहे. प्रतिवादी क्र. १३ब ते १३फ दाखल निशाणी ३२८ च्या अर्जात नि. १६५/१ सोबत हजर केलेले मोडी भाषेतील गहाणखत हे योग्य व कायदेशीर व्यक्तीच्या कब्जात होते असे कथन करत नाही. सदर गहाणखत हे योग्य व कायदेशीर व्यक्तीच्या कब्जातुन दाखल केलेले असेल तरच त्याला हस्ताक्षर स्वाक्षरी व निष्पादनाबाबतील गृहितक लागू होते. प्रतिवादींनी दाखल केलेल्या गहाणखताला व त्यातील मजकुराबाबत भारतीय पुरावा कायदा, १८७२ चे कलम ९० प्रमाणे गृहितक लागू होणार नाही. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४.        अभिलेखाचे अवलोकन केले तसेच दोनही बाजूचा युक्तीवाद ऐकला.

५.        वादीने दावा मिळकतीचे सरस निरस धडेवाटप होवून पृथक कब्जा मिळण्याकरीता प्रतिवादींविरुध्द दावा दाखल केला आहे. सदर दावा प्रतिवादीच्या पुराव्याकरीता प्रलंबित आहे. प्रतिवादीने त्याच्या बचावार्थ कागदोपत्री पुरावा म्हणून नि. १६५/१ कडे मोडी लिपीतील गहाणखताची सत्यप्रत दाखल केली आहे. तसेच त्यासोबत विठ्ठल आत्माराम केसरकर यांनी केलेल्या सदर गहाणखतातील मोडी लिपितिल मजकुराचे मराठी भाषेतील लिप्यांतराची प्रत दाखल केली आहे. सदर गहाणखतास पुराव्याकामी निशाणी देण्यास वादीने हरकत घेतली होती. त्यानंतर प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश १३ नियम ७ (३) अन्वये अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावरील आदेशान्वये वादीला १५ दिवसांच्या आत दिनांक २१/३/१९४२ रोजीच्या मोडी लिपितील गहाणखताचे मराठी भाषेतील लिप्यांतरीत प्रत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. परंतु वादीने सदर निर्देशाचे पालन केले नाही

व अद्याप गहाणखताची लिप्यांतरीत प्रत अभिलेखावर दाखल केली नाही. प्रतिवादींनी गहाणखताची मुळ प्रत दाखल केली आहे. सदर गहाणखताचे अवलोकन केले असता ते दिनांक २१/०३/१९४२ रोजी सबरजिस्ट्रार कार्यालय, सावंतवाडी व बांदे येथे नोंदणीकृत केले असल्याचे दिसून येते. सदर दस्त हा ३० वर्षांपेक्षा अधिक जुना दस्त आहे. तसेच सदर दस्त हा नोंदणीकृत आहे. त्यामुळे त्यास भारतीय पुरावा कायद्याचे कलम ९० प्रमाणे गृहितक लागू होते. सदर दस्तास पुराव्याकामी निशाणी देणे योग्य व न्यायोचित होईल. प्रतिवादींनी सदर गहाणखतातील मोडी लिपितील मजकुराची मराठी भाषेतील लिप्यांतरीत प्रत मुळ दस्तासोबत दाखल केली आहे. सदर लिप्यांतर करणारे विठ्ठल आत्माराम केसरकर हे मयत झाले आहेत. सदर लिप्यांतराची सत्यता सिध्द करण्याची जबाबदारी प्रतिवादीची आहे. त्यामुळे सदर लिप्यांतराच्या प्रतिला निशाणी देण्याची मागणी नामंजुर करण्यात येत आहे. वर नमुद कारणास्तव खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

प्रतिवादी क्र.१३ब ते १३फ यांनी नि. १६५/१ सोबत हजर केलेल्या फक्त मोडी भाषेतील मुळ गहाणखतास निशाणी क्रमांक देण्यात यावा.

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2024.08.16 17:13:15 +0530

दिनांक १६/०८/२०२४

(जा.म.मिस्त्री)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर
सावंतवाडी